## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१८

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल

**जाहिरात क्रमांक २ (शुध्दीपत्रक)** **सिंधुदुर्ग** **दिनांक** - ०७/०२/२०१८

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ (शा.नि. क्र. जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र. ३०२/तुरुंग-१, दि.१५/०१/२०१६ अन्वये), महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम २०१२ व शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस घटकात रिक्त असलेल्या पदांपैकी शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून **७५ टक्के** पदेच भरणेबाबत या कार्यालयाकडील समक्रमांक दि.०५/०२/२०१८ अन्वये संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानंतर मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पो.शि.भरती/मागणीपत्र-२०१८/५०१/२०१७/५९२, दि.०५/०२/२०१८ अन्वये १०० टक्के पदे भरणेची कार्यवाही करणेबाबत आदेशीत झाल्याने त्यानुसार खालील प्रमाणे **१०० टक्के** पदे भरण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हयात पोलीस शिपाई भरती आयोजीत करण्यात येत आहे.

१) **पोलीस शिपाई :-**

| | **खुला** | **अजा** | **अज** | **विज-अ** | **भज-ब** | **भज-क** | **भज-ड** | **विमाप्र** | **इमाव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | २४ | ८ | २१ | ४ | ० | २ | ५ | १ | ६ | ७१ |
| कप्पीकृत आरक्षण ⬇ | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ८ | ५ | ७ | २ | ० | १ | २ | १ | ३ | २९ |
| महिला | ७ | २ | ६ | १ | ० | १ | २ | ० | २ | २१ |
| खेळाडु | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| प्रकल्पग्रस्त | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ४ | १ | ३ | १ | ० | ० | १ | ० | १ | ११ |
| अंशकालीन पदवीधर | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| पोलीस पाल्य | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| गृहरक्षक दल | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| एकूण | **२४** | **८** | **२१** | ४ | **०** | **२** | **५** | **१** | **६** | **७१** |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१८ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. नमूद क्रमांक पोलीस भरती प्रक्रियेसाठी राहील.

| अ. क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास | ८४४८४४९९६४<br>e-mail id-<br>mahaonline.support@mapolice.gov.in |
| २ | भारतीय स्टेट बँकेच्यासंदर्भात अडचण असल्यास | ०२२-२२६६१७६५ |
| ३ | पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०२३६२-२२८२२५<br>०२३६२-२२८००८ |
| ४ | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यालयीन वेळेत) | ०२२-२२०२३६३७ |
| ५ | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचे **e-mail id:-** | adg.training.mumbai@mahapolice.gov.in |

**महत्त्वाची टिप:-**

आवेदन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत आवेदन अर्जांची प्रतीक्षा न करता, जसजसे आवेदन अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे उमेदवारांना भरती प्रक्रियेत बोलावण्यासाठी प्रवेशपत्र पाठविण्यात येणार आहेत. त्यामुळे उमेदवारांनी लवकरात लवकर आवेदन अर्ज सादर करण्याची दक्षता घ्यावी.

उमेदवाराने "**महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ वेळोवेळी झालेल्या सुधारणांसह**",चे कृपया अवलोकन करावे. सदर सेवाप्रवेश नियमांतील अटी व शर्ती सर्व उमेदवारांना लागू राहतील. ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याची प्रक्रिया याबाबतचे शासन निर्णय, उमेदवारांसाठी सूचना व सेवाप्रवेश नियम www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व **sindhudurgpolice.gov.in** या संकेतस्थळावर (Home page) उपलब्ध आहे.

- सदरहू माहिती काळीपूर्वक वाचून व समजल्याची खात्री करुन उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करावा.
- उपरोक्त सूचना शासन निर्णय / परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये काही तफावत आढळल्यास, संबंधित शासन निर्णय / परिपत्रकातील सूचना विचारात घ्याव्यात.
- सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी योग्यता अहवाल (खेळाडू उमेदवारांबाबत) आवेदन अर्ज भरण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक २८.०२.२०१८ किंवा त्यापुर्वीच्या दिनांकाची असावीत व सदरची मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे, कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

(दिक्षीतकुमार गेडाम)
पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग